


पेज ४


www.arambhmarathi.com

दैनिक
# आरंभ मराठी

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 123 ■ गुरूवार दि.12 जून 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5


जिल्ह्यात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने मान्सूनआधीच सर्वत्र पावसाळ्याची अनुभूती येऊ लागली आहे. रान-शिवारं हिरवळीने दाटली आहेत. जिल्ह्यातील कुंथलगिरीपासून तुळजापूरपर्यंत बालाघाटाच्या डोंगररांगा असून,हा परिसर हिरवळीने विलोभनीय दिसत आहे.


सततच्या पावसाने तीर्थक्षेत्र येरमाळा येथील येडेश्वरी देवीच्या डोंगररांगा आणि परिसर गर्द हिरवळीने बहरून गेला आहे. 'आरंभ मराठी'चे छायाचित्रकार गजानन तोडकर यांनी या परिसराचे ड्रोनने टिपलेले छायाचित्र.

# अकरावी प्रवेश प्रक्रियेत पुन्हा गोंधळ

## नवीन वेळापत्रकानुसार प्रवेश प्रक्रिया पंधरा दिवस लांबली

आरंभ मराठी | धाराशिव

**दहावीचा निकाल यंदा दोन आठवडे अगोदर जाहीर करून राज्य शिक्षण मंडळाने सुरुवात चांगली केली होती. मात्र त्यानंतरचा अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेतील कारभार पूर्णपणे नियोजनशून्य आणि गोंधळाचा ठरला आहे. वेळापत्रकात सतत बदल, विद्यार्थ्यांना अपूर्ण माहिती, तारखांबाबतचा संभ्रम, पोर्टलची तांत्रिक समस्या यामुळे धाराशिव जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य सध्या गोंधळात आहे. जुन्या वेळापत्रकानुसार परवा दिनांक १० जून रोजी कॅप फेरी एक जाहीर होणार होती. परंतु, आता दिनांक २६ जून रोजी ही फेरी जाहीर केली जाणार आहे. या बदलामुळे विद्यार्थ्यांसह पालकांचाही मनस्ताप वाढल्याचे चित्र दिसत आहे.**



राज्यातील अकरावीच्या ऑनलाईने प्रवेश प्रक्रियेत वेळापत्रकातील सततच्या बदलामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये मोठा गोंधळ निर्माण झाला आहे. रविवार दि. ८ जूनरोजी जाहीर करण्यात आलेले शून्य फेरीच्या गुणवत्ता यादीचे वेळापत्रक आणि त्यानंतर सुरू होणाऱ्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील माहिती पुन्हा एकदा बदलण्यात आली आहे. शिक्षण विभागाने अकरावीच्या प्रवेशासाठी काढलेल्या सुरुवातीच्यानिर्णयानंतरआतापर्यंत वेळापत्रकात तीनवेळा बदल केले आहेत. शून्य फेरीची गुणवत्तायादी ११ जून रोजी जाहीर झाली आहे. १२ ते १४ जूनदरम्यान त्यानुसार प्रवेशाची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. यापूर्वी जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकात १० जूनला पहिली गुणवत्ता यादी (कॅप राऊंड) प्रसिद्ध होणार होती. मात्र सुधारित वेळापत्रकानुसार ती आता तब्बल १६ दिवसांनी २६ जूनला प्रसिद्ध होणार आहे.१७ जून रोजी विद्यार्थ्यांनी निवडलेल्या शाळा आणि प्रवेश प्रक्रियेचे परीक्षण करण्यात येणार असल्याचे वेळापत्रकात नमूद आहे. मात्र, याअगोदर इतका कालावधी कशासाठी? हा मोठा प्रश्न पालकांपुढे उभा आहे. पहिल्या यादीनंतर २७ जून ते ३ जुलै या कालावधीत विद्याथ्यर्थ्यांना कॅप राऊंड अंतर्गत घ्यायचा आहे. दुसऱ्या फेरीसाठी ५ जुलै रोजी रिक्त जागांची यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. अर्थात पूर्ण जून महिना पहिल्या यादीलाच जाणार आहे. एका यादीमागोमाग दुसरी यादी आणि त्यानंतर वेळापत्रकात फेरफार, यामुळे विद्यार्थ्यांना योग्य म हाविद्यालय मिळेल का? असा प्रश्न विद्यार्थ्यांसह पालकांना पडला आहे.

### जिल्ह्यातील आकडेवारी

- दहावी उत्तीर्ण विद्यार्थी -२००७२
- अकरावी प्रवेशासाठी उपलब्ध जागा -२७४६०
- एकूण कॉलेज - १२४
- नोंदणी केलेले विद्यार्थी - १६५००
- अकरावी प्रवेशाचे नवे वेळापत्रक
- अंतिम गुणवत्ता यादी व शून्य फेरी वाटप ११ जून
- शून्य फेरी प्रवेश - १२ ते १४ जून
- नियमित फेरी १ चे वाटप - १७ जून
- नियमित फेरी प्रवेश जाहीर करणे - २६ जून
- प्रत्यक्ष महाविद्यालयात प्रवेश घेणे - २७ते ३ जुलै
- नियमित फेरी २ साठी रिक्त जागांची यादी - ५ जुलै

# अवैध मद्यविरोधी १३ छापे; शंभर लिटर गावठी दारू जप्त

आरंभ मराठी | धाराशिव

पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी (दि.१०) अवैध मद्य विरोधी धाराशिव जिल्हयात पोलीस ठाणे हद्दीत १३ कारवाया करण्यात आल्या. या छाप्यात घटनास्थळावर आढळलेले ५३० लिटर गावठी निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव, ११५ लिटर गावठी दारु व देशी विदेशी दारुच्या ७७ सिलबंद बाटल्याअसे मद्य जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या मद्याची एकत्रीत किंमत अंदाजे ७१,१३० रुपये आहे. यावरुन महाराष्ट्र मद्य मनाई कायद्यांतर्गत उमरगा पोलीस ठाण्यात ६, परंडा २, शिराढोण २, भूम २ आणि बेंबळी पोलीस ठाण्यात एक अशा वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात १३ गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

# सोशल मीडियावर बदनामी करण्याची धमकी, अल्पवयीन मुलीची आत्महत्या; दोघांवर गुन्हा

आरंभ मराठी | तुळजापूर

पंधरा वर्षीय अल्पवयीन अल्पवयीन मुलीला सोशल मीडियावर बदनामी करण्याची भीती दाखवून आणि मुलावर प्रेम कर नाहीतर जीवे ठार मारण्याची धमकी देऊन आत्महत्येस प्रवृत्त केल्याबद्दल दोघांविरुद्ध तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, मयत तरुणी सारिका बिजली शिकारे (वय १५ वर्षे, ५ महिने रा. राजेश नगर ढोकी ता. जि. धाराशिव ह.मु. पोलीस कॉर्टर एस.टी. कॉलनी तुळजापूर) या अल्पवयीन मुलीने दिनांक ३१ मे २०२५ रोजी सायंकाळी चार वाजता राहत्या घरी गळफास घेवून आत्महत्या केली. यातील आरोपी ओंकार कांबळे आणि नगिना शशिंकात पांडागळे (दोघे रा. कांक्रबा ता. तुळजापूर) या दोघांनी सारिका हिला वेळोवेळी घरी बोलावून घेवून ओंकार कांबळे याच्यावर प्रेम कर व त्याच्यासोबतच लग्न कर म्हणून दबाव टाकला. ओंकारसोबत लग्न न केल्यास तुझी सोशल मिडीयावर बदनामी करु आणि पिस्तुलने गोळी घालून मारुन टाकीन अशी धमकी सारिका हिला दिल्याने त्यांच्या त्रासास कंटाळुन सारिका शिकारे या तरुणीने आत्महत्या केली. सारिकाची आई बिजली मधुकर शिकारे (वय ३५ वर्षे) यांनी दिनांक १० जून रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन गुन्हा नोंदवला आहे.

# मारहाण करून भावांनी सहा लाख रुपये लुटले

मुरूम-दोन भावांनी घरातील अल्पवयीन मुलींना मारहाण करून घरातील सहा लाख रुपये चोरून नेल्याची घटना उमरगा तालुक्यातील अचलेर येथे घडली. यातील आरोपी सुनिल शिवाजी माकणीकर आणि स्वप्नील शिवाजी माकणीकर (रा.आचलेर ता. उमरगा) यांनी दिनांक ९ जून दुपारी साडेतीन वाजता अचलेर येथे फिर्यादी पुजा धुळाप्पा मलकुंदे (वय ४० वर्षे, रा. अचलेर ता. उमरगा) या घरी नसताना आरोपींनी फिर्यादीच्या घरी जावून त्यांच्या मुलींना शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण करुन धमकी दिली. तसेच कपाटातील ६,००,००० रुपये चोरुन नेले.

# मंदिर परिसरात थुंकणाऱ्या ८ पुजाऱ्यांना मंदिर बंदीची नोटीस

## बेजबाबदार वर्तनामुळे भाविकांमध्ये पसरला संताप

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजाभवानी मंदिर आणि परिसरात स्वच्छता, नियम पाळण्याची जबाबदारी असलेल्या काही पुजाऱ्यांनी बेजबाबदार वर्तन केल्याचा प्रकार समोर आला असून, त्यामुळे मंदिर संस्थानने संबंधित पुजाऱ्यांना मंदिर बंदीची नोटीस बजावली आहे.

श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करून थुंकणाऱ्या आठ पुजाऱ्यांवर मंदिर संस्थानने कडक कारवाईची भूमिका घेतली आहे. अशोभनीय वर्तनामुळे संबंधित पुजाऱ्यांना तीन महिन्यांसाठी मंदिरप्रवेश बंदीची कारवाई होण्याची शक्यता आहे. संबंधित पुजाऱ्यांनी मंदिर परिसरात तंबाखूजन्य पदार्थ खाऊन थुंकल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्पष्टपणे आढळून आले आहे. यामुळे मंदिर प्रशासनाने तातडीने दखल घेत, देऊळ कवायत कलम २४ व २५ अन्वये संबंधितांवर नोटीस बजावली आहे.



### वर्तन अशोभनीय

मंदिर प्रशासनाने नोटीसमध्ये स्पष्ट केले आहे की, पुजारी व्यवसायास अशा प्रकारचे वर्तन शोभणारे नसून,मंदिर परिसरातील पावित्र्याला बाधा पोहोचवणारे आहे. यामुळे मंदिराचे कायदा व सुव्यवस्थेचे उल्लंघन होत.असून,शिस्तीचा भंग होत आहे. नोटीस मिळाल्यानंतर तीन दिवसांच्या आत स्पष्टीकरण सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.अन्यथा, मिळालेला खुलासा असमाधानकारक असल्यास तीन महिन्यांची मंदिरप्रवेश बंदी घालण्यात येईल, असेही नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे.

### वर्तन कसे असावे, धडे देण्याची वेळ ..?

श्री तुळजाभवानी मंदिर राज्यातील एक प्रमुख आणि पवित्र तीर्थक्षेत्र असून, दररोज हजारो भाविक येथे दर्शनासाठी येतात. अशा पवित्र जागी तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करून थुंकणे हे अत्यंत अशोभनीय असून, भाविकांच्या भावना दुखावणारे आहे. त्यामुळे भविष्यात अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी मंदिर प्रशासनाने कडक पावले उचलण्याचे ठरवले आहे.

### या पुजाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

१. वैभव विशाल भोसले
२. विशाल दादासाहेब मगर
३. लखन रोहिदास भोसले
४. विशाल हनमंत चव्हाण
५. विशाल बाळासाहेब गंगणे
६. अक्षय किशोर कदम-भैय्ये
७. राहुल हनुमंत पवार
८. धीरज राजू चोपदार

# जिजाऊ चौकातील पोलिस चौकीला पोलिसांची प्रतिक्षा

आरंभ मराठी | धाराशिव

शहरातील जिजाऊ चौकात पोलिस चौकी उभारण्याचा प्रशासनाचा उद्देश साध्य होतोय का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. कारण तीन म हिन्यांपासून कागदावर सुरू झालेल्या पोलिस चौकीमध्ये एकही पोलिस कर्मचारी दिसत नसल्याने नावालाच पोलिस चौकी उभारण्यात आली आहे का, असा प्रश्न विचारला जात आहे. राष्ट्रमाता जिजाऊ चौकात वाढलेली गुन्हेगारी, टवाळखोरी रोखण्यासाठी पोलिस चौकी सुरू करावी, कायमस्वरूपी पोलिस कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी, अशी मागणी होत होती. आमदार सुरेश धस यांनी यासाठी पाठपुरावा केला होता. त्यांच्या मागणीची दखल घेऊन पोलिस महासंचालकांनी धाराशिवम धील जिजाऊ चौकात पोलिस चौकी उभारण्यास मान्यता दिली होती.पोलिस अधीक्षक कार्यालयाने तात्पुरत्या शेडमध्ये चौकी उभारली. मात्र त्यात पोलिस कर्मचारी दिसत नाहीत. जिजाऊ चौक ते संत गाडगे महाराज चौक या भागात म हाविद्यालय, शाळा, कोचगिं क्लासेस असल्याने विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते.या परिसरात टवाळखोरांकडून छेडछाडीच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहेत. या पार्श्वभूमीवर पोलिस चौकीची मागणी पुढे येत होती. मात्र, तीन महिन्यांपूर्वी उभारलेल्या पोलिस चौकीत एकही पोलिस कर्मचारी उपस्थित राहात नसल्याने चौकी नावालाच उभारली आहे का, असा प्रश्न विचारला जात आहे. पोलिस चौकीचे बुजगावणे होऊ नये, यासाठी पोलिस प्रशासनाने कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, अशी मागणी होत आहे.



दैनिक आरंभ मराठी

# लालपरीची ७७ वी वाटचाल



लालपरीला नुकतीच ७७ वर्ष पुर्ण झाली आहे. सामान्य ते असामान्य माणसांची जीवनवाहिनी होय. माझ्याही जीवनात तीची सेवा करण्याचा योग लाभला. अहिल्यानगर ते पुणे हा तिचा पहिल्या प्रवास.आणि त्या दिवसापासून ती आजपर्यंत अखंडपणे या राज्यभरात, देशाच्या कानाकोपऱ्यात अभिमानाने मिरवते आहे योगायोग असा की तिच्या वाढदिवसाच्या मुहूर्तावर महाराणी, राजमाता, राष्ट्रमाता, 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर'' यांच्या ३०० व्या जयंतीच्या मुहूर्तावर ''श्री क्षेत्र चोंडी ते इंदोर'' म्हणजे अहिल्यादेवींचे (माहेर ते सासर) असा हा अनोखा प्रवास करण्याचा ऐतिहासिक योग माझ्या लालपरीला मिळालाय. महत्त्वाचं म्हणजे अहमदनगर ते पुणे पहिली एसटी धावली आणि आज याच जिल्ह्याचे नामकरण अहिल्यानगर झालेय. कालच या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधान परिषद सभापती व अहिल्याबाई होळकरांचे वंशज रामजी शिंदे , मा आमदार गोपीचंद पडळकर , मंत्री अतुलजी सावे, मंत्री दत्तामामा भरने, अहिल्या सृष्टीचे शिल्पकार माजी मंत्री अण्णा डांगे, तसेच अनेक खासदार, आमदार, मान्यवरांच्या उपस्थितीत माझ्या लालपरीचा एक ऐतिहासिक प्रवास सुरू झाला.माझ्याही आयुष्याच्या जडणघडणीमध्ये या लाल परीचा सिंहाचा वाटा. इतर ठिकाणी नोकरीच्या अनेक संधी आल्या मात्र नशिबात लाल परीच असावी. १५ वर्षापासून लाल परीचा सेवक म्हणून प्रवाशांना सेवा देतो. लाल परीवर जीवापाड प्रेम करतो. बाल वयापासून माझाही तसा एसटीचाच प्रवास. लहानाचा मोठा आणि शिक्षण या लाल परी मुळेच झाले.तशी ती माझ्या जीवाभावाचीच.अनेक संकटे आली परंतु माझी लाडकी लालपरी कधीच थांबली नाही. या महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये माझ्या लालपरीचा सिंहाचा वाटा. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात मोठ्या दिमाखात डोलाने डोलत डोलत, मार्ग काढत, माझी लालपरी अनेक संकटे झेलत सर्वसामान्यांच्या पर्यंत पोहोचली. सर्वसामान्यांची जीवन वाहिनी, लोकवाहिनी, धमनी म्हणून लालपरिला ओळखलं जातं.अनेक रूपात लालपरी आजही अखंडपणे प्रवाशांच्या सेवेसाठी तत्पर आहे.या महाराष्ट्रावर या देशावर आलेली संकट आणि त्या संकटात या लाल परीचा घडलेला प्रवास आजही प्रवासी वर्ग तोंड भरून सांगतो. कोरोना काळातील असो वा इतर संकटे असतील, एका प्रवाशापासून असंख्य प्रवाशांपर्यंत माझी लालपरी शहरांपासून खेड्यापाड्यापर्यंत, आपलं देखणं रूप दाखवत फिरते. गाव तिथे रस्ता आणि रस्ता तिथे एसटी हे ब्रीद वाक्य घेऊन आजही प्रवाशांच्या सेवेसाठी माझी लाल परी अखंडपणे धावते आहे. याचा एक कर्मचारी म्हणून मला अभिमान वाटतो.या लालपरीने महाराष्ट्राला खूप काही दिलं. हजारो डॉक्टर, इंजिनीयर, उद्योजक, मंत्री, आमदार, खासदार, राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, उद्योग तसेच सर्वच क्षेत्रात सर्वांना प्रगतीच्या उंच शिखरावर घेऊन जाणारी, यशस्वी करणारी ही माझी लाल परीच आहे. अनेक जणांनी तिला विसरण्याचा प्रयत्न केला. अनेक जणांनी तिच्यावर दगडफेक केली, जाळपोळ केली, तिची विटंबना केली, तिचं प्रचंड नुकसान केलं, स्वतःच्या स्वार्थासाठी तिचा वापर केला मात्र ती त्यांच्यावर कधीच नाराज झाली नाही. अनेक रूपात ती प्रगतीच्या दिशेने धावत आहे. तिचे अनेक रूप या महाराष्ट्राने पाहिले.ऊन, वारा, पाऊस, उन्हाळा, पावसाळा, हिवाळा, सन, उत्सव सर्वच कार्यात ती नेहमी अग्रेसर असते. ती कधीच थकली नाही, कधी थांबली नाही. अनेक सवलतींच्या रूपाने अनेक अधिकारी या एसटीने घडवले. सुखः दुःख, गरीब-श्रीमंत असा कुठलाही भेदभाव लाल परीने कधी केला नाही. प्रवासी हे दैवत समजून तिने सर्वांना समान हक्क दिले. या सरकारचे सुद्धा आभार व्यक्त करावे तेवढे कमी आहेत. कारण या सरकारने हजारो नवीन लालपरी बस त्या महाराष्ट्राचं रूपडं पालटण्यासाठी दिल्या. आज त्या नवीन लालपरी महाराष्ट्राच्या सर्व रस्त्यांवरती, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात व महाराष्ट्र बाहेर धावताना दिसतात.महाराष्ट्र सरकारला आवाहन एक लाल परीचा कर्मचारी म्हणून या निमित्ताने महाराष्ट्र शासनाला आवाहन करतो आहे की, जशा तुम्ही हजारो लालपरी प्रवाशांच्या सेवेसाठी महामंडळाला दिल्या. असंख्य प्रवाशांना शेकडो सवलती दिल्या. तसं या कष्टकरी, वंचित, उपेक्षित, शोषित, पीडित, अन्यायग्रस्त, एसटी कर्मचाऱ्यांच्या हितासाठी थोडं काहीतरी द्या. त्यांच्यावरती होत असलेले हल्ले, अन्याय, अत्याचार थांबवा, त्यासाठी कडक कायदा करा. जुलमी हिटलरशाही नियमावली, शिस्त आणि आवेदन कार्यपद्धती यामध्ये बदल करा. त्याला तणावमुक्त, स्वाभिमानाने, सन्मानाने जीवन जगण्यासाठी प्रयत्न करा. या महाराष्ट्राचा सेवक आणि या महाराष्ट्राचा दुर्लक्षित कर्मचारी म्हणून त्याच्याकडे विशेष लक्ष द्या. तिचे कर्मचारी अनेक हाल अपेष्ठा, त्रास सहन करत आजही तिला तळ हाताच्या फोडाप्रमाणे जपतात, सांभाळतात.. या महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी हातभार लावतात.तुम्हीही त्या दुर्लक्षित एसटी कर्मचाऱ्यांना जपा. त्यांच्या स्वाभिमानासाठी थोडा हात सैल घ्या..त्यांचं मागणं समजून घ्या, मागण्या समजून घ्या, त्यांची मने समजून घ्या, त्यांच्या डोळ्यातले अश्रू पुसण्याचे काम करा. या महाराष्ट्राच्या प्रगतीत लालपरी च्या सेवकांचा सिंहाचा वाटा आहे हे विसरू नका.

**श्री. गणेश खटके**
**एसटी वाहक - शिरूर आगार (पुणे विभाग)**
**मो९३७३७९६८७१**

# गोविंदपूर येथे गजानन महाराज पालखीच्या महाप्रसादासाठी शिधा जमा करण्यास प्रारंभ




आरंभ मराठी | गोविंदपूर

शेगाव ते पंढरपूर पायी वारीसाठी निघालेल्या श्रींच्या पालखीचे कळंब तालुक्यातील गोविंदपूर येथे प्रतिवर्षा प्रमाणे यंदाही २४ जून रोजी आगमन होणार आहे. मंगळवार दिनांक २४ जून रोजी सकाळी ११ वाजता ७०० वारकऱ्यांसह अश्व, गाड्याच्या ताफ्यासह होणार आहे. वारकऱ्यासह दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन गोविंदपुर येथे करण्यात येते. यासाठी शिधा गोळा करण्याचे काम गोविंदपुर येथे सुरू करण्यात आले आहे. संत गजानन महाराज पालखीचा दुपारचा थांबा हा गोविंदपूर येथे असतो. यावेळी गोविंदपूरसह बोरगाव (बु), देवधानोरा, खामसवाडी, माळकरंजा, बोरवंटी, जवळा, एकुरका, नागझरवाडी, तसेच परिसरातील नागरिक हा सोहळा पाहण्यासाठी व पालखीचे दर्शन घेण्यासाठी हजारोच्या संख्येने उपस्थित असतात. यानिमित्त पालखीच्या सोबत आलेल्या वारकऱ्यासह दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यासाठी गोविंदपूर येथे शिधा जमा करण्याचे काम सुरू केले आहे. गजानन महाराज पालखीचे नियोजन समिती सूर्यकांत पाटील, मधुकर मिसाळ, चंदुलाल मुंडे, विष्णू ढोबळे, तुकाराम सौदागर, कुंडलिक माळी, मधुकर कोळी, सिद्धलिंग बिडवे, बापू बिडवे, बालाजी माळी, सायसराव मुंडे, साहेबराव होनमाने, शहाजी सुरवसे पोलीस पाटील, अण्णा पाटोळे व ग्रामस्थांच्या वतीने केले जाते. या सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन गोविंदपुर पालखी कमिटी व ग्रामस्थांनी केले आहे.

# बालकामगारांची परिस्थिती आणि भवितव्य



आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या वतीने २००२ पासून बालकामगार रोखण्यासाठी लोक जागृती वाढविण्याच्या हेतूने जागतिक बालकामगार विरोधी दिन आयोजित केला जातो. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेच्या (आय एल ओ) म्हणण्यानुसार १४ वर्षाखालील जी मुले स्वतःच्या आणि परिवाराच्या उदरनिर्वाहासाठी मोल मजुरी तसेच मेहनतीची कामे करून उदरनिर्वाह करतात त्यांना बालकामगार असे म्हटले आहे. बाल कामगारिता सामाजिक कलंक आहे. बाल कामगारिता प्रामुख्याने गरीब देशांमध्ये ठळकपणे आढळून येते.विकसनशील देशाच्या यादीत असलेल्या भारताची ही समस्या आजही कायम आहे. वेगवान आर्थिक प्रगती करणाऱ्या भारताला बाल कामगारितेवर विशेष लक्ष देणे क्रमप्राप्त ठरते. भारतात बालकामगार विरोधी कायदे झाले असले तरी बालमजूरांच्या संख्येत घट न होता ती कायमच दिसते. याचे मूळ कारण आर्थिक व सामाजिक परिस्थिती होय. आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी महानगरात ट्रॅफिक सिग्नल जवळ काही वस्तू विकणारी मुले,हॉटेल बसस्थानके, रेल्वे स्टेशन, पाणी खाद्यपदार्थाची विक्री करणारी मुले, खानावळीमध्ये टेबल साफ करणारी, शहरात कचरा वेचणारी, तर ग्रामीण भागात वीटभट्टीवर काम करणारी, शेतीत राबणारी या आणि अशा अनेक ठिकाणी लहान मुले मजुरी करताना दिसतात. काही सामाजिक संस्था कार्यकर्त्यांनी तक्रार केली असता अशा ठिकाणी धाडी पडतात. पण काही दिवसांनी परिस्थिती जैसे थे कायम असते. अशांनी हे समस्या मुळात मिटणारी नसून त्याचे खरे मूळ समाजाच्या आर्थिक परिस्थिती मध्ये दडलेले आहे. त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती खालावल्यामुळे बालकांच्या बौद्धिक,शारीरिक, विकासाच्या काळात अंग मेहनत करावी लागते हे समाजाच्या असमतोलपणाचे लक्षण होय.अशा बालमजुरी करणाऱ्या पालकांशी संवाद साधला असता असे निदर्शनास येते की, त्यांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती हलाखीची आहे. स्थलांतरित कुटुंबातीलचं मुले प्रामुख्याने बालमजूरीकडे वळलेली दिसतात. ' कमावते हात कमी आणि खाणारी तोंडे जास्त 'त्यामुळे मुलांना कामावर पाठविण्याशिवाय गत्यंतर नाही असे दबक्या आवाजात बोलले जाते. अनेक बालकांचे पालक व्यसनाधीन आहे त्यामुळे आपल्या पाल्यांच्या बौद्धिक, शैक्षणिक,सामाजिक परिस्थिती संभाव्य सुधारणा होणे होण्याची शक्यता धूसर असते.बालमन लवचिक असते. त्यांना आपल्या हक्कांची आणि कायद्यांची जाणीव नसल्यामुळे नकळत बालके कामात गुंतली जातात. अल्प मोबदल्यात अधिक काम करून घेणाऱ्यांची मानसिकता समाजात वाढताना दिसून येते. याकडे दुर्लक्ष होता कामा नये. कायद्यांचा कुठलाही जरब नसल्यामुळे बालकांना वेठबिगारी कामात गुंतवणाऱ्या टोळ्या मात्र निर्माण व्हायला नको! परिणामी अशा बालकामगारांना अनेकदा लैंगिक शोषणाला सामोरे जावे लागल्याची अगणित प्रकरणे पुढे आलेली आहेत. सतत स्थलांतर करणाऱ्या कुटुंबातील मुली कामासाठी बाहेर पडतात आणि अधिक कामाच्या मोबदल्यापाई कामावर ठेवली जातात. विकृत समाजाच्या मानसिकतेची वक्रदृष्टी त्यांच्यावर पडते. तिथे त्यांच्या लैंगिक शोषणास प्रारंभ होतो. बहुतेक मुली ह्या परिस्थितीमुळे वेश्या व्यवसायाकडे लोटल्या गेल्या आहेत. एवढेच नव्हे तर अनेकांची विक्री सुद्धा होते. धर्मांतरण, फूस लावून पळून नेणे अशी प्रकरणे अलीकडच्या काळात आढळून आली आहे. अनेक बालकांच्या कोवळ्या मनाचा फायदा घेऊन भीक मागण्यास प्रवृत्त केले जाते. तर काहींची वाटचाल अत्यंत धोकादायक अशा गुन्हेगारी प्रवृत्तीकडे होत असते.सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत खितपत पडलेले कुठल्या वळणावर जातात हे बघण्याचे नैतिक कर्तव्य शासन,प्रशासन, सुज्ञ समाजभान ठेवणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांवर येऊन ठेपलेली आहे. बालकामगार विरोधी दिनाच्या निमित्याने याचेही चिंतन व्हायला हवे..!



**शशिकांत मधुकर तोटे**
**दारव्हा,जि. यवतमाळ**
**मो:९१३०८३५४५८**

# आपल्या रडगाण्याचे गाणे होऊ द्या

दुःख व्यक्त केल्याने ते कमी होतं, पण ते मनात साठवून ठेवल्यास घुसमट होते. मी जेव्हा आजूबाजूला पाहतो, तेव्हा आपलं दुःख, वेदना एकमेकांना सतत सांगणारे लोक मला दिसतात. खरं तर 'राही मनवा दुख की चिंता क्यों सताती है, दुख तो अपना साथी है' असं म्हणत जगत राहणं एवढंच आपल्या हातात असतं.काही लोक आपल्या समस्यांचे, कष्टाचे आणि बिकट परिस्थितीचे सतत प्रदर्शन करत राहतात. स्वतःला दिनदुबळं समजतात. ''इतर माझ्यावर कसा अन्याय करत आहेत,'' याचा पाढाच ते वाचत राहतात. परिस्थितीशी दोन हात करायचे सोडून, ते परिस्थितीला शरण जातात.
हे असंच होत असतं... मोठी माणसं, श्रीमंत लोक, सत्ताधारी आणि गुंड हे लोकांवर अन्याय करतच असतात... हे असंच चालणार... आपल्या सामान्यांचा कोणी वाली नाही... आपण आपलं मन मारून जगलं पाहिजे... विनाकारण कोणाच्या वाट्याला जायचं कशाला... लोक काय म्हणतील?... माझ्या लेकराबाळामुळे मी काय करू शकत नाही... माझी परिस्थितीच नाही......असं त्यांचं सतत रडगाणं सुरू असतं.
असं म्हटलं जातं की, आपल्या भारतात समस्या सोडवण्यापेक्षा समस्यांवरच जास्त चर्चा होते. रस्त्यावरील खड्डे पाहून चार व्यक्ती चर्चेला उत आणतात गाड्यांची संख्या वाढली आहे... लोकप्रतिनिधींचं लक्ष नाही... कंत्राटदाराने निकृष्ट दर्जाचं काम केलं... फार मोठा भ्रष्टाचार झाला आहे... अमुक-तमुक सरकारचं कामच असं असतं अशी मोठी चर्चा होते. पण त्यातून मार्ग काही निघत नाही. कोणीही रस्त्यावर पडलेले खड्डे बुजवण्याचा प्रयत्न करत नाही. त्यासाठी योग्य पाठपुरावा करत नाही. देशभरातील अशा अनेक समस्यांवर चहाच्या कॅन्टीनमध्ये, कार्यालयात, चौकाचौकांत आणि सोशल मीडियावर नुसतं चर्चेचं गुऱ्हाळ सुरू असतं. यातून संभ्रम वाढत जातो, पण मार्ग काही सापडत नाही.कार्यप्रवण व्हायला, परिस्थिती बदलायला, खरंतर एखाद्याचं



प्रोत्साहन किंवा एखाद्याने केलेला अपमान सुद्धा पुरेसा असतो.
सतत रडणाऱ्या लोकांना उद्देशून कवी दुष्यंत कुमार म्हणतो:

''कौन कहता है कि आसमां में सुराख नहीं होता,
एक पत्थर तो तबीयत से उछालो यारो''

अशी वाक्यं मोटिवेशनल स्पीकर्स सतत सांगत असतात. त्यांच्या अशा भाषणामुळे अथवा व्हिडिओमुळे फुग्यात हवा भरल्याप्रमाणे आपल्यातही उत्साह भरतो. पण जेव्हा परिस्थितीशी दोन हात करण्याची वेळ येते, तेव्हा मात्र आपल्यातील ही हवा निघून जाते. विरुद्ध परिस्थितीशी, अन्यायकारक व्यवस्थेविरुद्ध लढताना भिंतीवर बुक्क्या मारल्या तर भिंत पडत नाही, उलट आपला हातच रक्तबंबाळ होतो, असा कटू अनुभव आपल्याला येतो.म्हणून माणसं परिस्थितीसमोर शरण जातात. खरंतर कोणत्याही संघर्षापूर्वी स्वतःला मानसिक, शारीरिक आणि बौद्धिक पातळीवर तयार करावं लागतं. पैलवान सुद्धा आखाड्यात मोठी कुस्ती जिंकण्यासाठी दंड-बैठका आणि दररोज कुस्तीचा सराव करत स्वतःला घडवत असतो. परीक्षेला जाण्यापूर्वी विद्यार्थी देखील वर्षभर रात्रंदिवस अभ्यास करत असतो. स्वतःचं मन, भावना, बुद्धी, शरीर जिंकण्यास तयार करण्यासाठी छोट्या छोट्या संघर्षांपासून सुरुवात केली पाहिजे.छोट्या यशांचं स्वागत केलं पाहिजे, कारण तेच खरे प्रेरणास्थान असते. क्रांती एका दिवसात होत नाही.
''एक चिंगारी ज्वाला बन जाती है'' या सिनेमातील संवादाप्रमाणे नवनिर्माणासाठी मनात एक 'चिंगारी' निर्माण होणं आवश्यक असतं. ''लाथ मारेल तिथे पाणी काढेल'' अशी धमक आणि मनातील दिव्य कल्पनाशक्ती यांच्या जोडीने एखादा व्यक्ती स्वतःसोबत अनेकांचं आयुष्यही घडवू शकतो.
खरंतर कोणताही व्यक्ती प्रथमतः आपल्या मनात हरतो. म्हणूनच मनात येणारे नकारात्मक विचार, निरुत्साह, आणि आळशीपणा वेळेत झटकणं गरजेचं आहे. आपल्या आजूबाजूला अनेक चुकीच्या, अन्यायकारक गोष्टी घडत असतात. मग त्याचं रडगाणं गात बसणं योग्य नाही. त्याचबरोबर ''साऱ्यांना गोळ्या घालायला पाहिजेत!'' असं संयम सुटल्यासारखं बोलणंही योग्य नाही.विरुद्ध परिस्थितीला हळुवारपणे, लोकशाही मार्गाने, आपल्या कलेनं आणि बौद्धिक चातुर्याने सामोरं गेलं पाहिजे. शेवटी, प्रत्येकानं लढलंच पाहिजे कारण ज्याच्या त्याच्या हिश्श्याची लढाई त्यालाच लढावी लागते. जीवनवादी लेखक वि. स. खांडेकर म्हणतात:
''आपल्या रडगाण्याचे गाणं होऊ द्या!''
हा विचार आपण सर्वांनी आपल्या जीवनवाटेचा मार्ग बनवला पाहिजे.



**किशोर जाधव**
**सोलापूर**
**मो. ९९२२८८२५४१**

# तुळजापूर ड्रग्ज रॅकेटचा भांडाफोड विनोद गंगणे यांच्यामुळेच

## स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार यांचा जवाब

आरंभ मराठी | तुळजापूर

राज्यभर चर्चेत असलेल्या तुळजापूर ड्रग्स प्रकरणात महत्त्वाचा मुद्दा समोर आला असून या प्रकरणात सेवन गटात आरोपी असलेले विनोद गंगणे यांनीच यामध्ये पोलिसांना महत्त्वाची टीप दिल्यामुळे पोलीसांनी ड्रग्ज रॅकेटचा भांडाफोड केल्याचा जबाब स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदर्शन कासार यांनी दिला आहे. हा जवाब १५ फब्रुवारी रोजी तामलवाडी पोलीस स्टेशन चे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोकुळ ठाकूर यांच्या समक्ष देण्यात आला आहे. या जवाबात म्हटले आहे की, सदर कारवाई मध्ये गोपनीय बातमीदार म्हणून विनोद विलास गंगणे (रा. तुळजापूर) यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तत्कालीन पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी तुळजापूर शहरात सुरू असलेल्या अमली पदार्थाची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेशित केले होते. सदर कारवाईसाठी विनोद गंगणे हे मदत करतील असे पोलीस अधीक्षक यांनी सांगितले होते. त्या अनुषंगाने विनोद गंगणे यांना संपर्क केला असता त्यांनी तुळजापूर शहरात होणारे एमडी ड्रग्ज खरेदी विक्री बाबत माहिती दिली. तसेच यासंदर्भात त्यांना कसे एमडी ड्रग्जचे व्यसन लागले, तसेच या व्यसनामुळे सामाजिक, आर्थिक व कौटुंबिक अडचणींना सामोरे जावे लागले. ते कशा प्रकारे या व्यसनातून बाहेर पडले याबाबतही पूर्ण माहिती दिली.तसेच यापुढे तुळजापूर मधील तरुणांनी या व्यसनाचे बळी पडण्यापासून रोखण्यासाठी ते एमडी ड्रग्स या अमली पदार्थाची विक्री करण्यावर कारवाई करता पोलिसांना मदत करण्यात असल्याचे सांगितले. त्यानंतर दिनांक ०२ फेब्रुवारी रोजी पोलीस अधीक्षकांनी दोन मोबाईल क्रमांक देऊन नमूद मोबाईल वापरकर्ते हे तुळजापूर शहरात अंमली पदार्थ विक्री करता येणार असल्यास सांगितले होते. परंतु सदर मोबाईल वापरकर्त्यांना याचा संशय आल्याने त्यांनी मोबाईल स्विच ऑफ करून ते फरार झाले. त्यानंतर १४ फेब्रुवारी

### माफीचा साक्षीदार बनवणार का,याकडे लक्ष

या प्रकरणात विनोद गंगणे हे सेवन गटातील आरोपी आहेत सध्या ते पोलीस कोठडीत असून त्यांच्यामुळे या प्रकरणाचा पूर्णपणे उलगडा झाला असल्याने त्यांना कायद्याद्वारे आता माफीचा साक्षीदार बनवण्यात येणार का ? याकडे आता सर्वांचे लक्ष लागणे आहे .

विनोद गंगणे यांनी व्हाट्सअप द्वारे त्यांच्या नंबर वरून कॉल करून याबाबत तुळजापूर येथील काही जण अमली पदार्थ विक्री करण्यासाठी आणायला मुंबई येथे गेले असल्याचे सांगितले. तसेच त्यांचे मोबाईल क्रमांकही पोलिसांना दिले.तसेच वेळोवेळी संपर्क करूनही याबाबत अधिक माहिती दिली. त्यांनी दिलेल्या माहिती द्वारेच पोलीस स्टेशन तामवालडी येथे एमडी ड्रग्ज अमली पदार्थ विक्रीकरीता आणणाऱ्या तिघांवर कारवाई करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे असे जबाब म्हटले आहे.या जबाबमुळे विनोद गंगणे यांच्यामुळेच या सर्व प्रकाराचा भांडाफोड झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

# पीओपी मूर्तीवरील बंदी मागे घेतल्याचा आनंद, मुरुडमध्ये निघाली बाप्पांच्या मूर्तीची भव्य मिरवणूक

## मूर्तिकार संघटनेच्या वतीने जोरदार जल्लोष

आरंभ मराठी | मुरुड



पीओपी मूर्तीवरील घातलेल्या बंदीला स्थगिती मिळाल्याने मुरुड मूर्तिकार संघटनेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये जल्लोष साजरा करण्यात आला. त्याचबरोबर या निर्णयाने आनंदित होऊन मुरुड येथील मूर्तिकारांनी मुरुड शहरात ट्रॅक्टरमध्ये गणपतीची मूर्ती ठेवून गावामध्ये मिरवणूक काढली. काही वर्षापूर्वी सरकारने पीओपीच्या मूर्तीला घातलेल्या बंदीमुळे मूर्तिकारावर उपासमारीची वेळ आली होती. त्यामुळे मूर्तिकारानी यासंदर्भात सरकारकडे पाठपुरावा करून पीओपीच्या मूर्तीवरील बंदी उठवण्याची मागणी लावून धरली होती. मूर्तिकार संघटनेच्या या मागणीला आता यश आले आहे. आता पीओपीवरील बंदीला स्थगिती दिल्याने मूर्तीकारामध्ये मोठा उत्साह निर्माण झाला असून, त्यांच्या रोजगाराचा प्रश्न सुटल्याचे मूर्तिकारांनी सांगितले. सरकारच्या या निर्णयाचे स्वागत करत मुरुड शहरात ट्रॅक्टरमध्ये गणेश मूर्ती ठेवून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. गुलाल उधळून मूर्तिकारानी जल्लोष केला. या मिरवणुकीचा समारोप मुरुड शहरातील सिद्धिविनायक मंदिरामध्ये करण्यात आला. यावेळी गणपतीची महाआरती करण्यात आली. यावेळी मूर्तिकार संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष तथा मुरुड मूर्तिकार संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत कुंभार, आबा खडके, गणेश कुंभार, विशाल कुंभार, खंडू कुंभार, अंकुश कुंभार, ग्रामपंचायत सदस्य आनंद कणसे तसेच मुरुड पोलीस स्टेशनचे कर्मचारी व गणेश भक्त यावेळी उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव ) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.- 2023/90078

www.arambhmarathi.com
दैनिक आरंभ मराठी
संमिश्र
गुरूवार दि.12 जून 2025

# जिल्ह्यातील २५५ गावांत सामूहिक जलव्यवस्थापनाचा उत्सव

## ‘जलस्पर्धा २०२५’पुरस्कार वितरण सोहळ्यात खेड गावचा प्रथम क्रमांक

आरंभ मराठी | धाराशिव






जागतिक पर्यावरण दिनानिमित्त ‘जलस्पर्धा २०२५’ पुरस्कार वितरण सोहळा धाराशिव येथे जिल्हा नियोजन भवन सभागृहात उत्साहात पार पडला. या समारंभात पाणी व्यवस्थापन आणि संवर्धन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यांतील गावांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रम वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट (वॉटर), पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन, धाराशिव जिल्हा प्रशासन, इंडिया क्लायमेट कोलॅबरेटिव्ह, आणि इंडसइंड बँक लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या पुरस्कार सोहळ्यास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी रविंद्र माने, जिल्हा जल जीवन मिशन अधिकारी मोहन सरवदे, स्वच्छ भारत मिशनचे हनमंत गादगे, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणाच्या श्रीमती मनीषा डोंगरे, तुळजापूर येथील टाटा सामाजिक विज्ञान संस्थेचे संचालक प्रा. रमेश जारे, वॉटर संस्थेचे कार्यकारी संचालक प्रकाश केसकर, इंडिया क्लायमेट कोलॅबरेटिव्ह व इंडसइंड बँक लिमिटेड या देणगीदार संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सोहळ्यात राज्य शासनाच्या पाणीपुरवठा विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी ऑनलाइन मार्गदर्शन केले. स्पर्धेचे समन्वयक डॉ. ईश्वर काळे यांनी स्पर्धेची प्रक्रिया आणि उद्दिष्टे स्पष्ट केली. ही स्पर्धा केवळ बक्षिसांसाठी नाही, तर जिल्ह्यातील गावांना जलव्यवस्थापन सुधारण्यासाठी पूरक आणि उत्साहवर्धक वातावरण निर्माण करण्यासाठी आहे. पारितोषिकाची रक्कम फक्त सार्वजनिक जमिनीवरील मृद व जलसंवर्धन उपचारांची देखभाल, दुरुस्ती किंवा नव्याने उभारणीसाठी वापरता येईल, तसेच गट ग्रामपंचायतींच्या बाबतीत, पारितोषिकाची रक्कम फक्त विजयी गावाने वापरायची असून ती इतर गावांसाठी वापरता येणार नाही.

### धाराशिव जलस्पर्धा २०२५ चे विजेते

प्रथम क्रमांक खेड ता. धाराशिव (५ लाख रूपये), द्वितीय दाउतपूर ता. धाराशिव (३ लाख रूपये), तृतीय क्रमांकाचा पुरस्कार १ लाख रूपये भांडगाव ता.परंडा आणि जवळगा मेसाई ता.तुळजापूर या गावांना प्रत्येकी ५० हजार रूपये विभागून देण्यात आला.

यावेळी डॉ. मैनाक घोष म्हणाले, स्पर्धेत पारितोषिक विजेत्या यशस्वी गावांनी वापरलेली प्रक्रिया इतर गावांनी आत्मसात करावी, ज्यामुळे भविष्यातील पाणी प्रश्नांचा आपल्याला यशस्वीपणे मुकाबला करता येईल प्रा. रमेश जारे यांनी जलव्यवस्थापनात लोकसहभागाचे महत्व विषद केले. वॉटर संस्थेचे कार्यकारी संचालक प्रकाश केसकर, म्हणाले की, जर गावाकडे जलक्रेडिट (जल व्यवस्थापनाची क्षमता) चांगले असेल, तर बँका आणि संस्था त्यांच्या पाठीशी उभ्या राहतात. संजय खंदारे यांनी त्यांच्या संदेशामध्ये या जलस्पर्धेचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले कि गावस्तरावरील परीमाणकारक जलव्यवस्थापन हे कोणत्याही शासकीय योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी अत्यावश्यक आहे. विशेषत: जल जीवन मिशनच्या कामांची शाश्वतता आणि अटल भूजल योजनेचे यश हे जलसुरक्षेवरच अवलंबून आहे, म्हणून या जलस्पर्धेचा विस्तार होणे गरजेचे आहे. महाराष्ट्र हे वॉटर गव्हर्नन्स स्टँडर्ड (जल कारभाराचे मानक) स्वीकारणारे पहिले राज्य आहे, आणि देशपातळीवर जलव्यवस्थापनाच्या कार्यक्रमांत आणि धोरणांत या मानकाचा समावेश करण्याची गरज आहे. जलस्पर्धा आणि पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी वॉटर संस्थेच्या धाराशिव विभागाचे व्यवस्थापक अभीजित कवठेकर, त्यांचे सर्व सहकारी आणि वॉटर संस्थेच्या पुणे येथील कार्यालयाचे जयंत पाटील, अरुण डहाळे, आश्लेषा गायकवाड, नवनाथ घोडके यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वॉटर संस्थेच्या अंकिता यादव व आदेश ठोंबरे यांनी केले.

### २५५ ग्रामपंचायतींचा सहभाग

हीआगळीवेगळीस्पर्धागावांमध्येजलस्वयंपूर्णताआणिपारदर्शकजलकारभारास चालना देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आली होती. वॉटर संस्थेने विकसित केलेल्या ‘वॉटर गव्हर्नन्स स्टँडर्ड’ म्हणजेच जलकारभाराचे मानक यावर आधारित प्रश्नावलीचा स्पर्धेतील सहभागी गावांच्या मूल्यांकनासाठी वापर केला गेला. या जिल्हास्तरीय जलस्पर्धेत धाराशिव जिल्ह्यातील सुमारे २५५ ग्रामपंचायतींनी सहभाग घेतला. तसेच या जलस्पर्धेत पहिल्या सर्वोत्तम दहा गावांचा त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल सन्मान करण्यात आला.

# तिर्थ बुद्रुक येथे मोरे परिवाराकडून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर तालुक्यातील तिर्थ बुद्रुक येथे कै.श्यामराव आबा मोरे कै.देवराव बापू गोरे यांच्या स्मृती प्रित्यर्थ सहशिक्षक बापूराव मोरे आणि प्रा. सुधीर मोरे या दोन बंधूकडून महाराष्ट्र विद्यालय आणि बारूळ येथील बाळेश्वर विद्यालयातील दहावी गुणवंत व शिष्यवृत्तीधारक धारक विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरणासह सत्कार करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र विद्यालयातील इयत्ता दहावी २०२५ मध्ये प्रथम क्र.प्रीती अंगद बोबडे, द्वितीय क्र. श्रावणी सोबाजी सोमवंशी आणि तृतीय क्र. मृणाल विजय लोहार तसेच बाळेश्वर विद्यालय बारूळ येथील प्रथम क्र.श्रीदेवी बालाजी लोखंडे, द्वितीय क्र.रेणुका योगेश वट्टे तर तृतीय क्र. सलोनी सुनील ठोंबरे या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना प्रत्येकी प्रथम क्रमांकासाठी २००१ रु., द्वितीय क्र.१५०१ रु. तर तृतीय क्र.१००१ रु. रोख रक्कम बक्षीस देऊन सोबत सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र, मिठाई पुडा आणि गुलाब पुष्प देण्यात आले. जि.प.शा.बारूळ येथील पाचवी मधील शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी कार्तिकी गणेश जांभळे,वेदांत प्रभाकर धनवडे,अथर्व शिवशंकर यावलकर, यांना प्रत्येकी २०१रु. सन्मान चिन्ह,प्रमाणपत्र,मिठाईपुडा आणि गुलाब पुष्प देण्यात आले. प्रसंगी बारूळ येथील राम कस्तुरे सर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्रीपतराव भोसले हायस्कूल धाराशिव येथील प्राचार्य नंदकुमार ननवरे तर अध्यक्ष म्हणून महाराष्ट्र विद्यालय तीर्थ बु। येथील मुख्याध्यापक रवींद्र पाटील हे होते. कार्यक्रमासाठी तीर्थ बु. येथील पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोरे बंधूकडून हा स्तुत्य उपक्रम घेण्यात आल्याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आदर्श शिक्षक आणि कार्यक्रमाचे संयोजक बापूराव मोरे यांनी केले तर प्राध्यापक सुधीर मोरे यांनी कार्यक्रमाचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन तानाजी म्हेत्रे सर यांनी केले.

# मोदी सरकारने विकासाची गंगा गोरगरिबांच्या घरापर्यंत आणली

## आमदार राणा पाटील यांचे पत्रकार परिषदेत मत

आरंभ मराठी | धाराशिव



संकल्प से सिद्धी हा वसा घेऊन वाटचाल करणाऱ्या केंद्र सरकारने गेल्या अकरा वर्षात भारत देशाला प्रगतीकडे घेऊन जाण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले असून, त्यामुळेच आज देशातील प्रत्येक नागरिक सरकारच्या कामावर समाधानी असल्याचे वक्तव्य ’मित्र’ चे उपाध्यक्ष आणि भाजपा आमदार राणा पाटील यांनी केले. भाजप प्रणित केंद्र सरकारला अकरा वर्षे पूर्ण झाल्याबद्दल घेतलेल्या पत्रकार परिषदेत आमदार पाटील बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने प्रत्येक क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. नुकत्याच झालेल्या ऑपरेशन सिंदूर मधून नेतृत्वाचा खंबीरपणा जगाने पाहिल्याचे पाटील यावेळी म्हणाले. आत्मनिर्भर भारत, संकल्प से सिद्धी याद्वारे सरकारने तंत्रज्ञानाचा वापर करून विकासाला पारदर्शक गती दिली. सरकार हे सेवा करण्यासाठी आहे या भावनेने गेल्या अकरा वर्षात सरकारने काम केले आणि सुशासन राबविण्याचा प्रयत्न केल्याचे आमदार राणा पाटील म्हणाले. युपीएच्या सरकारने दहा वर्षात महाराष्ट्र राज्याला एक लाख कोटी रुपये दिले होते. तर मोदी सरकारच्या दहा वर्षात राज्याला १० लाख कोटी रुपये मिळाले. धाराशिव जिल्ह्याला देखील आकांक्षीत जिल्हा म्हणून केंद्र सरकारने भरीव मदत केली. जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग, शौचालय, रेल्वे, पाणी या सर्व बाबतीत धाराशिव जिल्ह्याचा विकास झाला आहे. पीक विम्यातून जिल्ह्याला हजारो कोटी रुपये मिळाले. किसान सन्मान योजनेतून २ लाख ६७ हजार शेतकऱ्यांना मोठी मदत मिळाली आहे. काश्मीर संबंधी कलम ३७० चा विषय असो किंवा राममंदिराचा विषय असो कित्येक वर्षांपासून प्रलंबित असलेले हे विषय याच काळात मार्गी लागले. आयुष्मान भारत योजनेतून आरोग्याच्या क्षेत्रात सर्वसामान्य नागरिकाला आरोग्याचा अधिकार मिळाल्याचे त्यांनी सांगितले. लोकसभा आणि विधानसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षणाचा लाभ २०२९ पासून देण्यात येणार असल्याची घोषणा यापूर्वीच सरकारने केली आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही जगात सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था ठरली आहे. विकासाची ही गंगा मोदी सरकारने मागील अकरा वर्षात गोरगरिबांच्या घरापर्यंत नेल्याचे आमदार पाटील यावेळी म्हणाले. यावेळी पत्रकार परिषदेला भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांचीही उपस्थिती होती.

# भवानी तीर्थ कुंडाजवळील नाल्याची स्वच्छता करण्याची मागणी



आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर येथील बिडकर तलाव येथे बांधण्यात आलेल्या भवानी तीर्थ कुंडा जवळ उजव्या बाजूस रस्त्याच्या बाजूला एक भला मोठा नाला आहे. त्या नाल्यांमध्ये जवाहर गल्ली, मंगळवार पेठ, भवानी रोड, या भागातून मोठ्या प्रमाणात येणारे पाणी नाल्याद्वारे आराधवाडीत पास होते. परंतु सध्या ह्या नाल्यांमध्ये कचरा पडलेला असून गेली दोन ते तीन वर्षापासून या नाल्यातील कचरा काढण्यात आलेला नाही. त्यामुळे संपूर्णपणे नाला भरलेला असून त्यामुळे येणारे पावसाचे पाणी गटारीतून जात नसल्याने शहरातील अनेक ठिकाणी गटारीच्या पाण्याचा निचरा होत नसल्याने रस्त्यावरून वाहत आहे. तसेच अनेक गटारी तुंबलेल्या दिसून येतात. याबाबत गांभीर्यपूर्ण दखल घेऊन पाणी जाण्यासाठी नाला मोकळा करावा जेणेकरून पावसाळ्यामध्ये या परिसरात त्रास होणार नाही याबाबत गांभीर्यपूर्ण लक्ष न घेतल्यास नागरिकांच्या भक्ताच्या सुरक्षेसाठी आपण कोणत्याही क्षणी नगरपालिका तुळजापूर येथे परिसरात आत्मदहन करू असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस सोशल मीडिया तालुका प्रमुख बबन गावडे यांनी दिला आहे. तसेच सध्या तुळजापूर शहरात मोठ्या प्रमाणावर घाणीचे साम्राज्य आहे तरी याबाबत लवकर कारवाई न झाल्यास तसेच माझ्या जीवाचे बरे वाईट झाल्यास स्वच्छता अधिकारी व समृद्धी प्रायव्हेट लिमिटेड पुणे या कंपनीचे ठेकेदार हे जबाबदारातील असे या निवेदनात म्हटले आहे.

# महायुती सरकारविरोधात शिवसेना (उबाठा) पक्षाचे आज चक्काजाम आंदोलन

आरंभ मराठी | धाराशिव

महायुती सरकारने निवडणूक काळात दिलेल्या आश्वासनांची पूर्तता होत नसल्याच्या निषेधार्थ शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर धाराशिव शहरातील शिंगोली विश्रामगृहासमोर आज (दि.१२) चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे. शिवसेनेचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार कैलास पाटील, सहसंपर्कप्रमुख मकरंद राजेनिंबाळकर यांच्या उपस्थितीत हे आंदोलन करण्यात येत असल्याचे निवेदन बुधवारी जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. निवेदनावर पक्षाचे जिल्हा सचिव प्रवीण कोकाटे, प्रदीप साळुंके, राजेंद्र घोडके, दत्ता बंडगर, विजय सस्ते, तालुकाप्रमुख सतीशकुमार सोमाणी, शहरप्रमुख सोमनाथ गुरव, उपशहरप्रमुख बंडू आदरकर, युवासेना जिल्हाप्रमुख रवी वाघमारे, युवासेना तालुका प्रमुख राकेश सूर्यवंशी, युवासेना शहरप्रमुखअभिराजकदम,नगरसेवक राजाभाऊ पवार, बाळासाहेब काकडे, पांडू भोसले, राणा बनसोडे, गणेश असलेकर, देवानंद एडके, पंकज पाटील, अक्षय खळदकर, सतीश लोंढे, कलीम कुरेशी, गफुर शेख, शौकत शेख, अशोक पेठे, मिलिंद पेठे, असद रजवी, मुजीब काझी, भारत शिंदे, अण्णासाहेब देटे, सौदागर जगताप, बाळासाहेब वरुडकर, किरण बोचरे, बालाजी मगर, मंगेश काटे, सागर शेरकर, विश्वजित खोचरे, प्रवीण केसकर, अभिजित देशमुख, मनोज पडवळ, महेंद्र शिंदे, नंदू माने, नाना घाटगे, प्रसाद राजे, प्रशांत जगताप,अबरार कुरेशी यांची स्वाक्षरी आहे.

# नळदुर्ग शहरात पाण्यावाचून नागरिकांचे हाल; पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी निवेदन

आरंभ मराठी | नळदुर्ग

नळदुर्ग शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जॅकवेलवर २ मोटारी असताना सुद्धा नळदुर्ग शहरातील विविध भागात मागील काही महिन्यापासून सुरळीतपणे पाणीपुरवठा केला जात नाही. त्यातल्या त्यात येथील भिमनगर येथे मागील १५ दिवसापासून नळाद्वारे होणारा पाणीपुरवठा न झाल्यामुळे संतप्त झालेल्या त्या भागातील नागरिकांनी नगरपालिका प्रशासनाचा निषेध करीत नगरपरिषद कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले. खंडित झालेला पाणीपुरवठा सुरळीत करून भीम नगर येथे कायमस्वरूपी पाण्याचा प्रश्न मिटविण्याकरिता एखादी बोअरवेलची सुविधा करावी अशी मागणी मुख्याधिकाऱ्याकडे दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. जर तात्काळ पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास उद्यापासून नगरपरिषद च्या समोर महिला व मुलाबाळांसह पुन्हा आंदोलन करण्यात येईल असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे. या निवेदनावर अमर बनसोडे, योगेश सुरवसे, राजरत्न बनसोडे ,अमोल कांबळे, तुषार गायकवाड, वैभव कांबळे, अक्षय कांबळे, संदेश दूरुगकर, शुभम बोधले, ऋषिकेश कांबळे, मुकेश लोखंडे यांच्यासह अनेकांच्या स्वाक्षरी आहेत.

# गट प्रवर्तक व आशा स्वयंसेविका यांचे पाच महिन्यांचे वेतन थकले

## विविध मागण्यांसाठी हजारो महिलांचे जिल्हा परिषदेसमोर धरणे आंदोलन

आरंभ मराठी | धाराशिव



धाराशिव जिल्ह्यातील १२०० गट प्रवर्तक आणि आशा स्वयंसेविका यांचे पाच महिन्यांचे वेतन थकले असून, वेतनासह इतर मागण्यांसाठी आशा कार्यकर्त्यांनी बुधवारी (दि.११) जिल्हा परिषदेसमोर धरणे आंदोलन केले. यावेळी खेड्यापाड्यातून आलेल्या शेकडो आशा कार्यकर्त्यांनी घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला. जानेवारी पासून मे पर्यंत आशा कार्यकर्त्यांचे वेतन शासनाने दिलेले नसून यामुळे आशा कार्यकर्त्यांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. काम करुनही मानधन पाच-पाच महिने प्रलंबित असल्यामुळे घर चालवणे कठीण झाले आहे. बहुतांश गटप्रवर्तक व आशा स्वंयसेविकांवर संपुर्ण कुटुंबाची जबाबदारी आहे. तसेच गटप्रवर्तकांना दौरे करण्यासाठी हातात पैसे शिल्लक न राहील्यामुळे उसनवारी पैसे घेवुन दौऱ्याचा खर्च भागवावा लागत आहे. पाच महिने मानधन न मिळाल्यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या आशा स्वंयसेविका व गटप्रवर्तकांची चोहीकडून कुचंबना होत आहे. अशा आर्थिक टंचाईच्या परिस्थितीत देखील आशा स्वंयसेविका व गटप्रवर्तक यांचे इमानेइतबारे दैनंदिन कामकाज चालू आहे. आमचे थकीत मानधन तात्काळ वितरित करावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य आशा स्वयंसेविका व गट प्रवर्तक महासंघ या संघटनेने केली आहे. यासोबतच गटप्रवर्तकांना बायोमॅट्रीकची सक्ती करु नये, प्रधानमंत्री मातृवंदना योजनेच्या कामाचा थकीत मोबदला देण्यात यावा, ऑनलाईनची कामे करण्यासाठी आशांना चांगल्या दर्जाचा मोबाईल फोन, सिम कार्ड व रिचार्ज करीता पैसे दयावे, ढोकी पी.एच.सी.तील गटप्रवर्तकांना ढोकी गावासहीत समान कार्यक्षेत्र वाटप करण्यात यावे,केंद्र व राज्य निधीतून देण्यात येणारा मोबदला दरमहा व नियमित गटप्रवर्तक व आशांना देण्यात यावा, गटप्रवर्तकांनी कोणते रेकॉर्ड ठेवावे याबाबत स्पष्ट गाईडलाईन्स देण्यात याव्यात व त्यांना आशा डायरीप्रमाणे रेकॉर्ड लिहीण्यासाठी डायरी उपलब्ध करुन देण्यात यावी, कळंब तालुक्यातील रिक्त गटप्रवर्तकांची जागा त्वरीत भरण्यात यावी यादेखील मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत. संघटनेने मागण्यांचे हे निवेदन जिल्हा आरोग्य अधिकारी यांना दिले आहे.

# चाकरवाडी येथील सप्ताहासाठी ढोकीतून भाकरी,शिधा रवाना



आरंभ मराठी | ढोकी

धाराशिव तालुक्यातील ढोकी येथील माऊली भक्तांकडून चाकरवाडी येथे होत असलेल्या ज्ञानेश्वर माऊली दादा यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहासाठी भाकरी व शिधा घेऊन वाहन बुधवारी रवाना झाले. विसाव्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली दादा यांच्या पुण्यतिथीनिमित्त चाकरवाडी येथे प्रतिवर्षी अखंड हरिनाम सप्ताहाच्या आयोजन करण्यात येते.या सप्ताहास ८ जून रोजी प्रारंभ झाला आहे. ढोकी सह परिसरात वै.ज्ञानेश्वर माऊली महाराजांचा भक्त संप्रदाय मोठा आहे. यावर्षी अखंड हरिनाम सप्ताहात पंडित प्रदिप मिश्रा यांची शिव महापुराण कथा ८ ते १४ जून या कालावधीत होत आहे त्यामुळे भाविकांची संख्या मोठी आहे. येणाऱ्या भाविकांसाठी अखंड अन्नदान चालू आहे. या अन्नदानात आपला वाटा असावा म्हणून ढोकीसह परिसरातील माऊली भक्ताकडून गहू, ज्वारी, तांदूळ, डाळी या धान्यासोबतच भाकरी, लोणचे, ठेचा, शेंगदाणा चटणी बुधवारी सकाळी दहा ते बारा यावेळेत हनुमान मंदिरात जमा करण्यात आले. हनुमान मंदिरात महाआरतीनंतर भाविकांकडून जमा केलेल्या भाकरी व शिध्याची पूजा करण्यात आली. भाकरी व शिधा भरलेल्या वाहनाची पूजा सेवानिवृत्त मुख्याध्यापक पांडुरंग वाकुरे यांच्या हस्ते करण्यात आली.

दैनिक आरंभ मराठी
www.arambhmarathi.com
आपलं धाराशिव.
गुरूवार दि.12 जून 2025

# शरद पवारांचे विश्वासू विक्रमसिंह पाटणकरांच्या पुत्राचा भाजपात प्रवेश

## देसाई-पाटणकर राजकीय संघर्ष गडद होणार

सूर्यकांत पाटणकर | आरंभ मराठी

सातारा: एकीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचा वर्धापन दिन साजरा होत असतानाच सातारा जिल्ह्यातील वजनदार नेते शरद पवारांचे विश्वासू माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांचे चिरंजीव सत्यजित पाटणकर यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.एकेकाळी राष्ट्रवादीचा बालेकिल्ला समजला जाणारा सातारा जिल्हा आता भाजपामय झाला आहे.दरम्यान पाटणकरांच्या भाजपा प्रवेशामुळे सत्तेपासून दूर असलेल्या कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य निर्माण झाले असून पालकमंत्री शंभूराज देसाई व सत्यजित पाटणकर यांच्यातील संघर्ष मात्र आणखी गडद होण्याची चिन्हे या पक्षप्रवेशामुळे निर्माण झाली आहेत. एकेकाळी पश्चिम महाराष्ट्रावर वर्चस्व असलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला दिवसेंदिवस धक्के सहन करावे लागत आहेत राज्याचे माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांचे चिरंजीव सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक सत्यजित पाटणकर यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश केला आहे.जिल्ह्याच्या राजकारणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या पाटणकर यांना गेल्या १० वर्षापासून सत्तेपासून दूर राहावे लागले होते. सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी सत्यजित पाटणकर यांचा २०१४,२०१९, व २०२४ असा सलग तीन वेळा पराभव केला.परिणामी मतदार प्रलंबित विकास कामे ठप्प झाली सतत विरोधात राहिल्याने कार्यकर्त्यांमध्ये मरगळ आली त्याचा परिणाम गटाच्या संघटनात्मक बाबींवर होऊ लागल्याने पाटणकर यांनी भाजपामध्ये जाण्याचा मार्ग स्वीकारला मागील विधानसभा निवडणुकीत पक्षाने तिकीट डावल्याचा राग ही कार्यकर्त्यांमध्ये धुमसत होता. उलट पालकमंत्री शंभूराज देसाई हे गेली दहा वर्षे सत्तेत असल्याने व राज्यातील महत्त्वपूर्ण खात्यांची जबाबदारी त्यांच्याकडे असल्याने पाटणकर यांना सोडून मंत्री शंभूराज देसाई यांच्याकडे सत्तेत सहभागी होण्यासाठी अनेक कार्यकर्ते गेले. सत्तेत नसल्याने होणारी गळचेपी विकास कामांवर होणारा त्याचा परिणाम तर राष्ट्रवादी काँग्रेस बद्दल असणारा असंतोष हाच धागा पकडत सत्यजित पाटणकर यांनी पाटण विधानसभा मतदारसंघात कमळ फुलवण्याचा निर्णय घेतला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विश्वासू मानले जाणारे शंभूराज देसाई यांना पुन्हा अनपेक्षित पणे सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री पद मिळाले.जिल्ह्यात भाजपाचे चार आमदार असताना पालकमंत्री पद मंत्री शंभूराज देसाई यांनी आपल्याकडे खेचून आणले मात्र पालकमंत्री पदावर दावा सांगणारे मंत्री छ. शिवेंद्रसिंह राजेभोसले यांना ऐनवेळी पालकमंत्री पदाच्या शर्यतीतून माघार घ्यावी लागली मात्र याची सल मंत्री छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या मनात कायम राहिली.तर खा.छ.उदयनराजे भोसले हे महायुतीचे लोकसभेचे उमेदवार असताना केवळ ३० हजार मताधिक्याने विजयी झाले. पाटण तालुक्यात त्यांना अपेक्षित मते मिळाली नसल्याचा दावा करत मंत्री शंभूराज देसाई यांच्या विरोधातील सूर खा.छ.उदयनराजे भोसले यांच्या कार्यकर्त्यांनी बोलून दाखवला तर पोवई नाक्यावर लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या स्मारकाच्या वाद तर विकास कामांमध्ये निधी वाटपात होणारा अन्याय, तर पालकमंत्री असल्याने एक हाती प्रशासन चालवण्याचा देसाईंचा घाट आशा अनेक बाबींमुळे जिल्ह्याच्या महायुतीमध्ये धुसफूस सुरू होती. त्यामुळे जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई व जिल्ह्याचे दोन्ही राजे यांच्यात मनभेद निर्माण झाले याचा परिणाम महायुतीच्या संबंधावर होऊ लागला परिणामी पक्ष संघटना वाढवण्याच्या कारणाने खा. छ.उदयनराजे भोसले बंधू मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी सत्यजित पाटणकर यांना भाजपमध्ये आग्रह केला त्यामुळे सत्यजितसिंह पाटणकर यांनी मुंबईमध्ये भाजपा प्रदेश कार्यालयात जाऊन कमळ हातात घेतले. मात्र पाटण तालुक्यातील राजकीय पारंपारिक प्रतिस्पर्धी असलेल्या पाटणकर- देसाई या दोन्ही गटात राजकीय संघर्ष मात्र तीव्र होण्याची चिन्हे दिसू लागले आहेत. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये याची झलक तालुक्यातील जनतेला दिसेल यामध्ये शंका नाही.



# राज अहमद पठाण यांची शिवसेना (उबाठा) जिल्हा सहसंघटकपदी नियुक्ती

आरंभ मराठी | ईटकळ



राज अहमद पठाण यांची शिवसेना (उबाठा) जिल्हा सहसंघटकपदी नियुक्ती करण्यात आली. शिवसेना (उबाठा) पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी ही नियुक्ती महत्त्वपूर्ण मानली जात असून, राजअहमद पठाण यांची धाराशिव व तुळजापूर तालुक्याचे जिल्हा सहसंघटक म्हणून अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे. ही घोषणा शिवसेना भवन, मुंबई व शिवसेनेचे मुखपत्र सामना मधून येथून जाहीर करण्यात आली आहे. राजकारणात तळमळीने आणि निष्ठेने काम करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करत, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांच्या आदेशाने व धाराशिव जिल्ह्याचे खासदार ओमराजे निंबाळकर व धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाप्रमुख आमदार कैलास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही जबाबदारी देण्यात आली आहे. राजअहमद पठाण हे गेल्या ३६ वर्षांपासून शिवसेनेचा प्रचार व प्रसार ग्रामीण पातळीवर सातत्याने करत आहेत. जनसंपर्क, संघटन बांधणी आणि सामाजिक प्रश्नांवर ठाम भूमिका घेण्यात त्यांचा अनुभव समृद्ध आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्ष कार्य अधिक गतिमान होईल, असा विश्वास पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने व्यक्त केला. या नियुक्तीमुळे धाराशिव व तुळजापूर परिसरात शिवसेनेच्या संघटनात्मक विस्ताराला चालना मिळेल. राजअहमद पठाण यांच्या या निवडीबद्दल सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रामधून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. शिवसेना म्हणजे निष्ठा, शिवसेना म्हणजे लढा आणि राजअहमद पठाण यांच्या निष्ठेचा हा सन्मान असल्याचे मत शिवसैनिकातुन व्यक्त होत आहे.

# नियमबाह्य कारभार भोवला ; तुळजापूर तालुक्यातील काटगाव सरपंचाचे पद रद्द

आरंभ मराठी | तामलवाडी

तुळजापूर तालुक्यातील काटगाव येथील सरपंच अशोक दगडू माळी यांना अपात्र घोषित करून त्यांचे सरपंच रद्द करण्याचा आदेश छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी दिला आहे. तुळजापूर तालुक्यातील काटगाव येथील सरपंच अशोक दगडू माळी यांच्याविरुद्ध सुनील राजाराम रोकडे मौजे काटगाव तालुका तुळजापूर व इतर यांनी विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांच्या न्यायालयात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ३९(१) नुसार तक्रार दाखल केली होती. त्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद धाराशिव व गटविकास अधिकारी पंचायत समिती तुळजापूर यांचे अहवाल मागून घेण्यात आले होते. ज्यामध्ये असे आरोप ठेवण्यात आले होते की, सरपंच जे गावात मनमानी कारभार करून ग्रामपंचायतमध्ये जमा झालेली रक्कम ग्रामनिधीमध्ये जमा न करता परस्पर हातावर खर्च करून अनियमित्ता केल्याचे स्पष्ट होते. विविध लोकांना अधिकार नसताना वारस प्रमाणपत्र देणे, ग्राम पंचायत १००/- रुपयाचे आदर आधारे मालमत्तेचे हस्तांतरण नोंद मंजूर करून घेणे, नमुना नंबर ८ वर नोंद घेणे, आर्थिक अनिमित्तता, अधिकार नसताना मनीषा खोबरे व रेवन खोबरे यांना रहिवाशी प्रमाणपत्र देणे, शासकीय नियमाप्रमाणे मागासवर्गीय विकासाकरता १५% व दिव्यांग कल्याण करतात ३% टक्के रक्कम खर्च न करणे यासह इतरही आरोप सिद्ध झाल्यामुळे अशोक दगडू माळी यांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ३९(१) चे उल्लंघन केल्यामुळे त्यांना ग्रामपंचायतच्या सरपंच पदावरून सांप्रत कालावधीसाठी अपात्र घोषित करण्यात आले आहे. याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद धाराशिव यांचा अहवालही त्यांच्या विरोधात गेलेला होता. यातील सर्व आरोप सुनावणीअंती सिद्ध झाले होते. यामुळे काटगाव परिसरात या राजकीय घडामोडीमुळे राजकीय चर्चेला उधाण आले आहे.

# शिवसेना पक्षाच्या वतीने महायुती सरकारविरोधात भूम येथे आंदोलन



आरंभ मराठी | भूम

शिवसेना (उबाठा) पक्षाच्या वतीने भूम शहरात पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने जिल्हाप्रमुख रणजित ज्ञानेश्वर पाटील यांच्या मार्गदशनाखाली भुम तालुका व शहराच्या वतीने महायुती सरकार विरोधात *क्या हुवा तेरा वादा* नावाने आंदोलन करण्यात आले. सरकारने निवडणुकीत जी आश्वासने दिली होती ती न पाळल्याच्या निषेधार्थ हे आंदोलन करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांची कर्ज माफी, शेतकरी सन्मान योजनेचे १५ हजार रुपये, लाडक्या बहिणीचे दरमहा २१०० रु, ४५००० हजार पानंद रस्ते, शेतीला चोवीसतास वीज पुरवठा, मराठवाडा वाटर ग्रीड ला केंद्राकडून मंजुरी या आश्वासनाचे काय झाले असा सवाल विचारण्यात आला. यावेळी तहसीलदार भुम यांच्या मार्फत मुख्यमंत्री , उपमुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले. यावेळी भूम तालुका प्रमुख अनिल दादा शेंडगे, उपजिल्हाप्रमुख चेतन बोराडे, दिलीप शाळू महाराज, शहरप्रमुख प्रकाश आकरे, महिला तालुका संघटक उमाताई रणदिवे , अब्दुल भाई सय्यद, अविनाश गटकळ,अजय कोकाटे, रफीक तांबोळी, श्रीमंत भडके, दत्तात्रय खरात,संजय नाईकिंदे, सुर्यकांत औताडे,शहाजी जगदाळे, बालाजी दुधाळ, सुभाष पाटूळे,विनोद रैडे, अजित तांबे, विनोद रेडे,जयराम शेंडगे, दत्तात्रय बोंबले, पिराजी शेळके, रणखांब,,संदीप चंदनशिव, अरूण खटाळ आदी शिवसैनिक उपस्थित होते.

# शासकीय आयटीआयचे प्रवेश मोफत करण्याबाबत आमदार राणा पाटील यांना पाच हजार विद्यार्थ्यांचे निवेदन

आरंभ मराठी | धाराशिव

शासकीय आयटीआयचे प्रवेश मोफत करण्याबाबत 'मित्र' चे उपाध्यक्ष आमदार राणा पाटील यांना पाच हजार विद्यार्थ्यांनी निवेदन देऊन याप्रकरणी मदत करण्याचे आवाहन केले. सध्या आयटीआय ची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. आयटीआय ही अनेक वर्षापासून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना नोकरी देणारी प्रशिक्षण संस्था म्हणून ओळखली जाते. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेणारे विद्यार्थी हे अत्यंत गरीब असतात. शासकीय आयटीआयचे प्रवेश पुर्णतः मोफत करण्यासाठी पायल बनसोडे, माहिन शेख,प्रियंका घोडके, शिला गायकवाड, अक्षता देशमुख, पारस चाकवते, शंतनू देटे, लिंगेश्वर लगदिवे, अदनान काजी, सुरज गायकवाड यांनी पाच हजार विद्यार्थ्यांचे निवेदन आमदार राणा पाटील यांना दिले. तंत्र शिक्षण व व्यावसायिक शिक्षणासाठी मुलींना मोफत शिक्षण यापूर्वीच शासनाने केलेले आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत मुलींना मोफत प्रशिक्षण मिळत नाही. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत मागास प्रवर्गासाठी नऊशे पन्नास रुपये व खुल्या गटासाठी बिगर अभियांत्रिकी गट सतराशे पन्नास, अभियांत्रिकी गट एकोनिसशे पन्नास रुपये व मशीन गट एकविसशे पन्नास रुपये इतकी फिस आहे. यात सहाशे रुपये अनामत रक्कम आहे. दरवर्षी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांच्या फिसच्या माध्यमातून शासनाकडे अनामत रक्कम वगळता सुमारे सहा कोटी रुपये जमा होतात. त्यात निव्वळ शासन जमा रक्कम तीन कोटी रुपये आहे. प्रथम वर्षाचे नव्वद हजार प्रवेश प्रशिक्षणार्थींचा पाच कोटी रुपयांचा, द्वितीय वर्षाच्या चाळीस हजार प्रशिक्षणार्थींचा अडीच कोटी रुपयाचा बोजा शासनावर पडेल. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रथम व द्वितीय वर्षाच्या मिळून एक लाख तिस हजार प्रशिक्षर्थ्यांचा साडे सात कोटी रुपयांचा बोजा पडेल. यात दरवर्षी शासन जमा होणारी रक्कम तीन कोटी आहे. यात दरवर्षी पंचवीस हजार महिला विद्यार्थिणींना व एक लाख मोफत पुरुष विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश मिळेल असे निवेदनात म्हंटले आहे.



### दीड लाख विद्यार्थ्यांना फायदा होईल

शासकीय आयटीआयचे प्रवेश मोफत केल्यास दीड लाख विद्यार्थ्यांना फायदा होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्किल इंडिया, आत्मनिर्भर भारत या योजनांना बळ मिळेल. देशात आयटीआय सर्वात जुने व देशभर प्रशिक्षणाचे जाळे असलेले प्रशिक्षण केंद्र आहे. यापूर्वी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नाने दरमहा ४० रुपये असणारे विद्यावेतन दरमहा ५०० रुपये करण्यात आले. यासाठी त्यांनी अनेक तारांकित प्रश्न विधानसभेत मांडले होते. मित्र ही संस्था शासनाच्या सर्व विभागांना मार्गदर्शन करते त्यामुळे विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी मदत मिळेल अशी अपेक्षा आहे.

डॉ. किरण झरकर

# माजी मुख्यमंत्री खा. नारायण राणे यांनी सहकुटुंब घेतले श्री तुळजाभवानी देवींचे दर्शन

आरंभ मराठी | तुळजापूर

राज्याचे माजी मुख्यमंत्री व खासदार नारायण राणे यांनी बुधवारी सहकुटुंब श्री तुळजाभवानी देवीचे दर्शन घेऊन कुलधर्म, कुलाचार पार पाडत भाविकतेने देवीची ओटी भरली. पौर्णिमेच्या शुभ मुहूर्तावर राणे कुटुंबीय खास देवींच्या दर्शनासाठी तुळजापूर येथे दाखल झाले होते. राणे कुटुंबीय हे श्री तुळजाभवानी देवीचे निस्सीम भक्त आहेत. याआधी आठवड्याभरापूर्वीच राज्याचे मंत्री नितेश राणे यांनीदेखील तुळजाभवानीचे दर्शन घेतले होते. माजी मुख्यमंत्री नारायण राणे, त्यांच्या पत्नी व इतर कुटुंबीयांनी मंदिरात उपस्थित राहून विधिवत दर्शन घेतले व देवीची ओटी भरली. मंदिर संस्थानच्या वतीने तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) अरविंद बोळंगे यांनी श्री तुळजाभवानी देवीची प्रतिमा, कवड्यांची माळ व महावस्त्र भेट देत राणे दांपत्यांचा यथोचित सन्मान केला. यावेळी पोलीस निरीक्षक अण्णासाहेब मांजरे, सहायक पोलिस निरीक्षक अर्जुन चौधर, मंदिर संस्थानचे सहायक व्यवस्थापक (धार्मिक) अनुप ढमाले, लेखापाल सिद्धेश्वर इंतुले, जनसंपर्क अधिकारी अनिरुद्ध देशपांडे, दिनेश निकवाडे, सुरक्षा निरीक्षक ऋषिकेश पाटील, प्रतीक दिवाणजी, सहायक जनसंपर्क अधिकारी अभिजित तेरखेडकर, पुजारी रामभाऊ छत्रे तसेच मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.

# नळदुर्ग-अक्कलकोट रोडवरील कंदुरमळा गावाकडे जाणाऱ्या रस्त्याची दुरावस्था

आरंभ मराठी | नळदुर्ग



राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५२ नळदुर्ग- अक्कलकोट रोड वरील येडोळा गावास कंदुरमळा मार्गाने जाण्यासाठी असलेल्या रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे रस्त्याची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली असून त्याचा फटका शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांना मोठ्या प्रमाणात बसून नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे प्रशासनाने याकडे विशेष लक्ष देऊन कंजूरमळा ते येडोळा या रस्त्याचे काम तात्काळ करावे अशी मागणी ग्रामस्थातून होत आहे. कंदूरमळा ते येडोळा या दोन किलोमीटर अंतर असलेल्या रस्त्याचे काम तेरा वर्षांपूर्वी झाले आहे. त्यामुळे रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यामुळे रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे . या भागातील विद्यार्थी शालेय व महाविद्यालयीन शिक्षणासाठी तसेच या गावातील लोक दैनंदिन व्यवहार व आरोग्याशी निगडित कामांसाठी देखील दररोज ये-जा करतात. मात्र हा रस्ता खराब झाल्यामुळे वाहनचालक येण्यासाठी टाळाटाळ करतात. त्यामुळे शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांना या रस्त्यावरून ये जा करण्यास अडचणीचा सामना करावा लागतो. पावसाळ्याच्या दिवसात तर या रस्तावर पाण्याचे डबके साचून विद्यार्थी व ग्रामस्थांना चिखलातून पायपीट करावी लागते. तसेच खड्डे व चिखलामुळे दुचाकीस्वार घसरून पडतात. त्यामुळे या रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करुन काम करावे अशी मागणी येडोळा येथील ग्रामस्थ रवी पाटील, अमोल जाधव, राजेंद्र सास्तुरे, लखन चव्हाण, गुंडू राठोड, दिलीप चव्हाण, प्रवीण कांबळे, सुरेश लोंढे यांनी केली आहे.

# राष्ट्रीय कृषि बाजार ई-नाम योजनेमध्ये उमरगा कृषि उत्पन्न बाजार समितीची निवड

आरंभ मराठी | उमरगा




केंद्र शासनाच्या नविन धोरणानुसार ई-नाम राष्ट्रीय कृषि बाजार या नविन प्रणालीमुळे शेतकरी बांधवांचा आर्थिक फायदा होणार असुन, व्यवहारातील पारदर्शकता वाढणार असल्याचे प्रतिपादन भारत सरकार कृषि मंत्रालयाचे नियुक्त मार्गदर्शक रंगनाथ कटरे यांचे उमरगा कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये केले. केंद्र शासानाचे राष्ट्रीय कृषि बाजार ई-नाम योजनेमध्ये उमरगा कृषि उत्पन्न बाजार समितीची निवड झाल्यामुळे त्या अनुषंगाने बाजार समितीतील परवानाधारक आडते व्यापारी व अधिकारी/कर्मचारी तसेच कार्यक्षेत्रातील शेतकरी बांधव यांच्यासाठी उमरगा कृषि उत्पन्न बाजार समिती सभागृहात बुधवारी (ता. ११) केंद्र शासनाच्या नविन धोरणानुसार ई-नाम (राष्ट्रीय कृषि बाजार) योजने बाबत संबंधीत माहिती देण्यासाठी मार्गदर्शपर प्रशिक्षणवेळी रंगनाथ कटरे बोलत होते. ते म्हणाले की, शेतीमालास योग्य भाव, शेतीमालाचे वर्गीकरण (ग्रेडींग) योग्य हाताने व मालाचे योग्य वजन व विक्री झालेल्या मालाचे या योजने अंतर्गत राज्यातील इतर बाजार समितीमध्ये नोंद असणाऱ्या खरेदीदारांना व्यापाऱ्यांना बोली लावणे शक्य होणार आहे. त्यामुळे स्पर्धा निर्माण होऊन चांगला दर मिळवता येणार आहे. भविष्यात गावातील शेतीमालास राष्ट्रीय स्तरावरही बाजार पेठ उपलब्ध होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होणार असून, शेतकऱ्यांना देय असणाऱ्या रक्कमांबाबत अधिक सुरक्षितता निर्माण होणार आहे. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी शेतकरी बांधवांनी ई-नाम साठी उमरगा बाजार समितीकडे नोंद करणे गरजेचे आहे. नोंदणीसाठी आधारकार्ड, बैंक पासबुक, झेरॉक्स व मोबाईल नंबर अनिवार्य आहे. तसेच आपल्या मोबाईलव्दारे गूगल प्ले स्टोअर मधुन ई-नाम ॲप डाउनलोड करून पण स्वतः आपली नोंदणी करु शकता असे ही रंगनाथ कटरे यांनी स्पष्ट केले. समितीचे सचिव सिध्दप्पा घोडके म्हणाले की, केंद्र शासनाच्या ई-नाम योजनेचा शेतकरी व व्यापारी बांधवांना फायदा होणार आहे. ई-नाम अंतर्गत बाजार आवारात होणाऱ्या शेतीमालाच्या लिलावाची प्रक्रिया सर्वप्रथम ई-नाम प्रक्रियेव्दारे राबविणार आहे. यासाठी बाजार समितीच्या एकुण २६ व्यापाऱ्यांना ई-नाम योजनेमध्ये समाविष्ठ केले असून ई-नाम मध्ये एकूण ११३२ शेतकऱ्यांची नोंदणी केली आहे असे घोडके यांनी स्पष्ट केले. यावेळी कृषि उत्पन्न बाजार समिती सभापती बसवराज कस्तुरे, उपसभापती विजयकुमार माने, संचालक प्रल्हाद काळे, सुभाष गायकवाड, मारुती पाटील, राजेंद्र तळीखेडे, विक्रम इंगळे, बालाजी महावरकर, गुंजोटी वि. का. सो. चे. सचिव बालाजी पोतदार, संचालक किसन पाटील, अण्णाराव सुर्यवंशी व व्यापारी धनराज हिरमुखे, सुभाष गिरीवा, प्रकाश सुर्यवंशी व बाजार समितीचे सचिव सिध्दप्पा घोडके व सर्व कर्मचारी तसेच शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व प्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.